प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

मे 20, 2019

**शिवम सहकारी बँक लि. इचलकरंजी, जिल्हा-कोल्हापुर, महाराष्ट्र ह्यांना दिलेले निर्देश - मुदतवाढ**

भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्देश दि. मे 18, 2018 अन्वये) शिवम सहकारी बँक लि., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापुर, महाराष्ट्र ह्यांना, मे 19, 2018 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून निर्देशांखाली ठेवले होते.

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ च्या पोटकलम 1) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँक निर्देश देते की, निर्देश दि. मे 13, 2019 अन्वये, वरील निर्देश त्या बँकेला आणखी तीन महिन्यांसाठी, म्हणजे ऑगस्ट 19, 2019 पर्यंत लागू असतील.

वरील मुदतवाढ दिली असलेल्या निर्देशाची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेली वरील मुदतवाढ आणि/किंवा बदल ह्याचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत रिझर्व्ह बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**एन. षण्मुगराम**
सहाय्यक महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/2718**